**व्ही. सी. व्दारे साक्षीदार क्र.५**

**मी याव्दारे प्रतिज्ञेपुर्वक निवेदन करतो की,**

**नाव : पो.ना अशोक सोन्याबापु कुदळे,**

**वय : ३६ वर्ष, धंदा: नोकरी,**

**रा. राहुरी पोलीस स्टेशन, ता. राहुरी, जि.अ.नगर.**

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेमार्फत सुरू :**

दि. २४.१२.२०२३ रोजी माझी नेमणुक नेवासा पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक या पदावर होती. त्यादिवशी सहाय्यक फौजदार के.आर.साळवे यांनी गु.र.नं. १२२७/२०२३ भा.द.वि कलम ३५४, ५०४, ५०६ चा तपास लेखी आदेशाने माझ्याकडे दिला. आता मला सदरील आदेश दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर सहाय्यक फौजदार के.आर.साळवे यांची सही आहे. ती मी ओळखतो कारण ते माझे सहकारी आहे. सबब सदरील **आदेशास नि. ३४** देण्यात येते. त्यानंतर दि. २५.१२.२०२३ रोजी मी घटनास्थळी जावुन घटनास्थळ पंचनामा दोन पंचासमक्ष केला. सदरचे घटनास्थळ हे बकुपिंपळगाव शिवारात शेत गट नं. ३३ व ३७ च्या मधुन जाणा-या रस्त्यावर होते. आता मला नि.२१ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचाची सही आहे. त्यानंतर मी दोन साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर मी आरोपीला फौ.प्र.सं कलम ४११ ची नोटीस दिली. आता मला सदरील नोटीस दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. सबब सदरील **नोटीसीस नि. ३५** देण्यात येते. त्यानंतर मी मा. न्यायालयाला फिर्यादीचे फौ.प्र.सं कलम १६४ प्रमाणे जबाब नोंदणीकमी पत्र दिली. आता मला सदरील पत्र दाखविण्यात आले. ते तेच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सबब सदरील पत्रास नि.३६ देण्यात येते. त्यानंतर मला मा. न्यायालयातुन फौ.प्र.सं कलम १६४ प्रमाणे जबाब प्राप्त झाला तो जबाब मी दोषारोप पत्रात सामील करून आरोपी विरुध्द पुरावा उपलब्ध झाल्यामुळे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. माझ्या तपासात असे निष्पन्न झाले की, आरोपीने भा.द.वि कलम ३५४, ५०४, ५०६ प्रमाणेचा गुन्हा केला. त्यामुळे मी आरोपीविरुध्दचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. आरोपीने या रस्त्याने जायचे नाही म्हणुन फिर्यादीचा विनयभंग करून तिला दमदाटी करून, तिला शिवीगाळ केली. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण,**

**आरोपीतर्फे विधिज्ञ ॲड. श्री. एल.डी.घावटे यांचे मार्फत सुरु-**

हे मी सांगू शकत नाही की, आरोपी हा फिर्यादीचा पुतण्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा फिर्यादीच्या घरापासुन पाच ते सहा कि.मी अंतरावर रहाण्यास आहे. हे मी सांगू शकत नाही की, आरोपीने फिर्यादीच्या पती विरुध्द यापुर्वी नेवासा पोलीस ठाण्यात केसेस दाखल केल्या आहेत. मी घटनास्थळी एक वेळेस गेलो होतो. घटनास्थळी मी प्रवरासंगम - बकुपिंपळगाव मार्गे गेलो होतो. हे मी सांगू शकत नाही की, घटनास्थळ पंचनाम्यावरील दोनही पंच फिर्यादीचे नातेवाईक आहेत. घटनास्थळावरील दोनही पंच सर्वात अगोदर घटनास्थळी आले होते. आम्ही घटनास्थळी गेल्यानंतर आम्ही घटनास्थळ पंचाना घटनास्थळी बोलविले. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही घ टनास्थळाच्या आजुबाजुच्या लोकांचे जबाब नोंदविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पाण्याच्या जारवाल्याचा जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही घटनास्थळ पंचनामा पोलीस ठाण्यात तयार केला व पंचाच्या फक्त त्यावर सहया घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासत सांगितलेला सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या पतीचे व आरोपीचे नेहमी भांडण होत असे व त्या भांडणाच्या रागातुन फिर्यादीने आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीच्या पतीचे व आरोपीचे वाद असल्याच्या दृष्टीकोनातुन मी तपास केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करुन, खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**उलटतपास पुर्ण,**

**फेरतपास नाही.**

**दोन्ही पक्षांची ऑडीओ तसेच व्हिडीओ बाबत तक्रार नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.03.09 11:22:30 +0530

दिनांक :-०९/०३/२०२६

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.